5

# बौद्ध काळातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा

**यु.जी.सी.द्वारा मान्यता प्राप्त लघु शोध प्रबंध अहवाल**


सादरकर्ता

**प्रा. प्रणोती म. सहारे**

एम.ए. नेट (पाली प्राकृत)

पाली प्राकृत विभाग

**पी.डब्ल्यू.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर**

# ACHIEVEMENTS FROM THE PROJECTS

बुद्धकालीन स्त्रियांचे सामाजीक महत्व महामानव तथागत गौतम बुद्धाने वैदिक परंपरेला झुगारुन तत्वज्ञानाच्या पातळीवर, सामाजिक, सांस्कृतिक, क्षेत्रामध्ये स्त्रीला समाजामध्ये समान दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा परिणाम समाजातील वेगवेगळया स्तरातील स्त्रिया बुद्धाच्या प्रभावाने प्रभावित होऊन भिक्षुनी संघात प्रविष्ट झाल्या. तसेच तत्कालीन समाजातील स्त्रिया स्वावलंबी स्वतःच्या कार्य क्षमतेवर आर्थिक अडचणी दूर करीत असत. तत्कालीन समाजात स्त्रियांचे मुख्य काम गृहकार्य होते किंवा नृत्य गायन करुन आपले जीवनयापन करीत असत. काही स्त्रीया विविध कला कौशल्यात नैपुण्य प्राप्त केले होते. तर काही स्त्रिया अतिशय हुशार व वादविवाद पटू होत्या. महत्वाची गोष्ट ही की तत्कालीन स्त्रिया पुरुषाप्रमाणे मुक्ती मार्गावर आरुढ होवून निर्वाणसारख्या पदाला पोहचल्या होत्या.

थेरी गाथेतील स्त्रियांच्या जीवनापासून खरोखर आधुनिक काळातील स्त्रियांना बरेच शिकण्यासारखे आहे. थेरी गाथेमध्ये स्त्री जीवनाचा आदर्श व्यक्त झालेला आहे. हीच स्त्रीची प्रतिमा आहे.

# SUMMARY :

# IDEOLOGY A STUDY

## बुद्धकालीन स्त्रियांचे सामाजीक दर्जा

बुद्धकालीन व बुद्धोत्तर भारतीय समाज जीवनामध्ये स्त्रियांचे स्थान हे पुरुषाला दुय्यम अशा प्रकारचे होते. बुद्धाच्या काळामध्ये भारतामध्ये पुरुषप्रधान समाज व्यस्था आपल्या आक्रमकतेने प्रविष्ट झालेले होती. वैदिक संस्कृती ही मूलतः पुरुषप्रधान स्वरुपाची होती. स्त्रियांच्या वाटयाला पुरुषापेक्षा दुय्यम व विषम जीवन आलेले होते. हा अनुभव बुद्ध पूर्व काळातील स्त्रियांचा होता. कोणत्याही स्त्रीला चूल आणि मूल हयापासून सुटका तर नाहीच पण हे काम काहीसे कमी दर्जाचे असेच मानले जात आहे. स्त्रीला माणूस म्हणून स्वतंत्र व मानाचे जीवन जगतायेत नव्हते. पुरुषपणाच्या वरचढ चौकटीत बांधले गेलेले 'पुरुष' आणि बाईपणाच्या परखड, दुबळया, नितत्व संस्कारात घडविल्या गेलेल्या स्त्रिया हयापैकी कोणीही खरे मानुसकीचे आयुष्य जगू शकत नव्हते. स्त्रियांच्या दुःखाला अजून 'वाचा' फुटलेली नव्हती. घरातील मुलगी म्हणून, पत्नी म्हणून, सून म्हणून, सासू म्हणून सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या दुःखाना वाचा फुटलेली नव्हती. वेळच्या वेळी लग्न करणारी, सासरचे घर आपले माननारी, मुलगा झाला की वंशाला दिवा मिळाला असे मानून धन्य होणारी, मुलीला परक्याचे धन समजने अशी बुद्धपूर्व काळात स्त्रियांची स्थिती होती.

परंतु बुद्धकाळामध्ये स्त्रीयांचा सामाजिक दर्जा हा उंचावलेला होता. भगवान बुद्धानी स्त्रीला समाजामध्ये समाज दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा परिणाम म्हणजे समाजातील वेगवेगळया सांस्कृतिक, आर्थिक स्तरातील स्त्रिया बुद्धाच्या विचाराने प्रभावित होऊन भिक्षुणी संघात प्रविष्ठ झाल्या. भगवान बुद्धाच्या काळामध्ये स्त्रियांचा सामाजीक दर्जा हा समानतेचा होता. हे थेरी गाथेच्या अध्यनावरुन स्पष्ट होते.

## CONTRIBUTION TO THE SOCIETY

स्त्रीयांनी व थेरीनी त्याकाळी भगवान बुद्धाच्या प्रेरणेने ते दुःख कवटाळून न बसता नवा आदर्श निर्माण केला व समाजाला नवसमाज निर्मितीसाठी दिशा दर्शन केले. त्याचप्रमाणे सर्वसामान्य स्त्रीयांनी उपभोग केला. दुःख व समाजात विविध स्तरात पसरलेले दुःख, दैन्य हे वेशीवर टांगून स्त्री मुक्तीचा बिगुल वाजविला. बौद्ध कालीन समाजातील स्त्री अन्याय मुक्त नव समाज निम्र्रण करण्याला समतेचा आशावाद नव्या पिढीसाठी निर्माण केला या स्कंथनामधून स्त्रीच्या व्यक्तित्वाची व अस्तित्वाची ओळख करुन देत असतांना स्त्री ही गुलाम असतें कां? ती पुरुषावलंबी असते का स्त्री कातार असते कां? या प्रश्नांची उत्तरे त्यांनी स्वकथनांमधून दिलेली आहेत. स्त्रियांची स्वकंथने म्हणजे स्वयंप्रकाशित होण्याचा पाऊलखुणा आहेत आणि म्हणून हा विषय अतिशय महत्वाचा आहे. आज इतरत भटकलेल्या स्त्रियांनाही बुद्धकालीन सामाजिक स्त्रीयांचा दर्जा कशाप्रकारे होता. स्वबळावर अर्हतपदाला सुद्धा प्राप्त झाल्या. हा आदर्श डोळयासमोर ठेवून आधुनिक स्त्रियांना याचा लाभ होईल आणि हया विषयाचा संस्थेला सुद्धा लाभ होईल.